# सहा महिन्यांत आरे कारशेड ५४% पूर्ण

## देवेंद्र फडणवीस : वर्षभरात मेट्रो तीनचा पहिला टप्पा सुरू करणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आल्यापासून मेट्रो प्रकल्पांनी वेग घेतला आहे. सहा महिन्यात आरे येथील कारशेडचे ५४ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे. येत्या डिसेंबरपर्यंत कारशेडचे काम पूर्ण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्यामुळे या वर्षा अखेरीस किंवा जानेवारी महिन्यात वांद्रे ते सीप्झ हा मेट्रो ३ चा पहिला टप्पा सुरू होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना फडणवीस यांनी मेट्रो -३ सह मुंबईतील सर्वच मेट्रो प्रकल्पांच्या कामांची सद्यस्थिती विशद केली. विशेषतः मेट्रो -३ बाबत फडणवीस म्हणाले की, मुंबईसाठी हा सर्वात महत्वाचा प्रकल्प असून ४० किलोमीटरचा हा भूमिगत मेट्रो प्रकल्प आशियातील सर्वात लांब सिंगल लाईन प्रकल्प आहे. मात्र, महाविकास आघाडी सरकारच्या काळात आरे कारशेडचा प्रश्न निर्माण झाला, त्यामुळे तीन वर्षे काहीच काम झाले नाही.

नवीन सरकार आल्यानंतर कारशेडच्या कामावरील स्थगिती उठविण्यात आली, बंद असलेले काम पुन्हा सुरू केले. येत्या डिसेंबरपर्यंत कारशेडचे सर्व काम पूर्ण करण्यात येईल. त्यामुळे वांद्रे ते सीप्झ दरम्यानचा पहिला टप्पा सुरू करता येणार असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

केवळ कारडेपो नसल्यामुळे मेट्रो ट्रेन्स तयार असूनही त्या मुंबईत आणणे शक्य होत नव्हते. मात्र हे सरकार आल्यानंतर अवघ्या दोन महिन्यात तात्पुरती ट्रेन रिसिविंग फॅसिलिटी तयार करून पहिली ट्रेन मुंबईत आणण्यात आली. तिच्या चाचण्याही सुरू झाल्या.

दुसरी ट्रेन सुद्धा डिसेंबरमध्ये आली. आता तिसरी आणि चौथी ट्रेन सुद्धा लवकरच मुंबईत दाखल होणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. मेट्रो ३ प्रकल्पाचे ८० टक्के पूर्ण झाल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुंबई महानगर क्षेत्रात एकूण ३३७ किलोमीटर लांबीच्या मेट्रोची कामे सुरु आहेत. २०१४ ते १९ याकाळात मोठ्या प्रमाणावर मेट्रोचे काम हाती घेण्यात आले. तेंव्हा ३३७ किमीचे हे प्रकल्प अनेकांना स्वप्न वाटत होते. पण, आज यातील नऊ मोठ्या मार्गिकांचे काम ४० ते ७० टक्क्यांपर्यंत पोहचल्याचे फडणवीस यांनी सांगितले.



### मेट्रोची कामे दृष्टिक्षेपात

### मेट्रो प्रकल्पांचा फडणवीस यांनी मांडलेला लेखाजोखा



- आज एकूण ३३८ कि.मी. ची मेट्रोची कामे सुरू आहेत. एकूण १४ मार्गिका, २२५ हून अधिक स्थानके असून सुमारे दीड लाख कोटींहून अधिकची ही कामे आहेत. २०३१ पर्यंत एक कोटी लोकांच्या मेट्रो प्रवासाचे नियोजन आहे.

मेट्रो-२ ब ३६.२३%

मेट्रो ४ ४७.८७%

मेट्रो ४ अ ४८.३५%

मेट्रो ५ ७२.२५%

मेट्रो ६ ६७.५%

मेट्रो ७ ए ११.७६%

मेट्रो ९ ४५.०३%

- मेट्रो १०: सल्लागाराची नियुक्ती.
- मेट्रो १२ : सल्लागाराची नियुक्ती, सर्वेक्षण, अलाईनमेंट ड्रॉईंग प्रक्रियेत, सिव्हील कामांसाठी निविदा आंमत्रित.